तरुण भारत संवाद

# विद्यार्थ्यांच्या संशोधनाला आंतरराष्ट्रीय पेटंट

## कणकवली 'एसएसपीएम'च्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा



प्रो. कल्पेश कांबळे



दर्शन माटवकर



अभिषेक कविटकर



गौरांगी सावंत



सईश वाडकर



कार्तिक मोरे

वीरेंद्र चिंदरकर
कणकवली

कणकवली तालुक्यातील हरकुळ बु. येथील सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने आपल्या शिरपेचात अभिमानास्पद तुरा खोवला आहे. या विद्यार्थ्यांनी केलेल्या 'ॲडव्हान्स डिझाईन ऑफ डस्टबीन ऑफ वेस्ट सेपरेशन' या संशोधनाला आंतरराष्ट्रीय पेटंट मिळाले आहे. 'युनायटेड किंगडम ऑफ ग्रेट ब्रिटेन' सरकारने संशोधनाच्या पेटंटला मान्यता देऊन त्यांना पुढील संशोधनासाठी प्रोत्साहन दिले आहे.

या संशोधनाच्या फायद्याने कचरा वेगळे करणे सहजरित्या शक्य होणार आहे. संशोधनाचा वापर घरगुती कचरा वेगळा करण्यासाठी होऊ शकेल. कॉलेजच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

एसएसपीएम इंजिनियरिंग कॉलेजची इलेक्ट्रिकल विभागाची विद्यार्थिनी गौरांगी सावंत व मेकॅनिकल विभागाचे विद्यार्थी सईश वाडकर, आदेश सावंत, दर्शन माटावकर, कार्तिक मोरे, अभिषेक कविटकर यांनी केलेल्या या संशोधनाच्या विषयाचे सर्वच सामाजिक स्तरांकडून कौतुक केले जात आहे.

'ॲडव्हान्स डिझाईन ऑफ डस्टबीन ऑफ वेस्ट सेपरेशन' या नावाने पेटंटला मान्यता मिळाली आहे. या संशोधनाच्या डिझाईनमधून ओला व सुका कचरा एका तरफेच्या सहाय्याने सहजपणे वेगळा केला जाऊ शकतो. ओला व सुका कचरा लागलीच वेगळा केल्यामुळे कचरा व्यवस्थापनसाठी लागणारा नाहक त्रास कमी होतो. हा त्रास वाचल्यामुळे पुढील रिसायकलिंगची प्रक्रिया लवकर होण्यास मदत होते.

कणकवली अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या या संशोधनाची 'युनायटेड किंगडम ऑफ ग्रेट ब्रिटन' सरकारने दखल घेऊन त्यांना पुढील संशोधनासाठी प्रोत्साहन दिले आहे.

सदर पेटंट मिळण्यासाठी मेकॅनिकल इंजिनियरिंग विभागाचे प्राध्यापक कल्पेश सुनील कांबळे यांनी विशेष मेहनत घेतली.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली याबाबत सर्व तांत्रिक व इतर सोपस्कार पार पाडत पेटंट मिळण्यासाठी नोंदणी केली होती. त्याला आंतरराष्ट्रीय पेटंट मिळणे ही संस्थेसाठी अभिमानाची बाब असल्याची भावना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. बाडकर व प्रशासकीय अधिकारी शांतेश रावराणे यांनी व्यक्त केली आहे.

या कार्यक्रमासाठी एसएसपीएम संस्थेचे संस्थापक केंद्रीय उद्योगमंत्री नारायण राणे, अध्यक्षा सौ. नीलम राणे, उपाध्यक्ष, माजी खासदार नीलेश राणे, सचिव आमदार नीतेश राणे, प्रशासकीय अधिकारी शांतेश रावराणे, प्राचार्य डॉ. डी. एस. बाडकर, सर्व विभागप्रमुख तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.